दिनांक: ११/१०/२०१९ //२१//

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४३/२०१४
नि. १११ लगत

**<u>शपथेवर सुरू</u>**

**<u>उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ सौ.आर.पी.नाईक यांचेमार्फत</u>**

१३. दावा मिळकतींचे सर्व्हे वर्णन मला सांगता येईल. स.नं.१७१ चा अ चा ६, क्षेत्र १४७ गुंठे आहे. स.नं. ७८ चा ३, क्षेत्र ५४ गुंठे आहे. स.नं. ७८ चा १, क्षेत्र १ गुंठा आहे. ६, १ व ३ हे पोट हिस्सा नंबर आहेत. वरील मिळकतींच्या चतु:सिमा मला सांगता येईल. चतु:सिमेस कोणते सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर आहेत ते मला आठवत नाहित. हे म्हणणे खरे नाहि की, दावा मिळकतीच्या हद्दी मला सांगता येत नाहित. हे म्हणणे खरे नाही की, आता दावा मिळकतीकडे गेलो तर मला कोणत्या मिळकतीची हद्द कुठे सुरू होवून कुठे संपते हे सांगता येणार नाही. स.नं. १७१अ, हि.नं.६ च्या पूर्वेला खांदारे व कातवडकर, पश्चिमेला फनासे, कदम व तेली , उत्तरेला परब व फनासे व दक्षिणेला सोनु घाडी आहेत. मी सांगितलेल्या लगतकब्जेदारांचे सर्व्हे नंबर, हिस्सा नंबर मला आठवत नाहित. स.न. ७८ हि.नं.१ या मिळकतीच्या पूर्वेस कोण आहे हे मला आठवत नाहि, पश्चिमेला कोण आहे ते असे सांगता येणार नाही, उत्तर व दक्षिणेस कोण आहेत हे सांगता येणार नाहि. स.नं. ७८ हि.नं. ३ या मिळकतीच्या पूर्वेस खांदारे आहेत, पश्चिमेस तेली आहेत, उत्तरेस कातवणकर व दक्षिणेला सोनू घाडी आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, सर्वे नं. ७८ हि.नं. ३ च्या चतु:सिमेची नांवे सांगितली त्यांचे सर्वे नंबर व हिस्सा नंबर मी सांगू शकत नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीनी वादी क्र.१ ते ४ यांचे आजोबा रामचंद्र आप्पा बागवे यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती वादींच्या स्वतंत्र कब्जाभोग्य वहिवाटीस आजोबांच्या काळापासून आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०४/०१/१९४४ रोजी दावा मिळकती रामचंद्र आप्पा बागवे यांनी स्वत: खरेदीखतान्वये खरेदी केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र आप्पा बागवे यांनी दिनांक १७/१२/१९५७ च्या पूर्वी आबा बापू फणसे यांच्याकडून दावा मिळकती तोंडी खरेदीखताने विकत घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र आप्पा बागवे यांनी सन १९५७ पूर्वी ग्रामपंचायत इमला क्र. १०० हा दावा

मिळकतीत बांधला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, त्या इमल्यामध्ये रामचंद्र आप्पा बागवे, त्यांची पत्नी व मुले वास्तव्यास होती. हे म्हणणे खरे नाही की, वादीचें आजोबा रामचंद्र यांना वादींचे वडील बाळकृष्ण रामचंद्र बागवे हे एकमेव वारस मुलगा होता. रामचंद्र सन १९६८ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की, रामचंद्र यांच्या मृत्यूपश्चात बाळकृष्ण हे दावा मिळकतीचे मालक झाले. मी साक्ष देण्यास येण्यापूर्वी दावा मिळकतीचे सर्व महसुली रेकॉर्ड पाहिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वारस रजिस्टर अ.क्र. २४ कडे रामचंद्र आप्पा बागवे यांचे वारस मुलगा म्हणून बाळकृष्ण यांचे नांव आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याप्रमाणे फेरफार क्र. ७८३ झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. ७८३ अन्वये वादीच्या वडीलांचे नांव वारस म्हणून नोंद झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी आपल्या आई वडील व भावंडासह आजोबांच्या काळापासून दावा मिळकतीत वास्तव्यास आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, वादीचे वडील बाळकृष्ण हे सन १९९७ मध्ये मयत झाले. हे म्हणणे बरोबर आहे की, वादीचे वडील बाळकृष्ण यांना रमाकांत, रामचंद्र, शकुंतला व वैशाली ही चार मुले आहेत.

१५. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीतील इमला क्र. १०० जीर्ण होवून पडला. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडीलांनी सन १९९० मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर दावा मिळकतीमध्ये पुन्हा इमला बांधला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा इमला दावा मिळकत क्र. १ मध्ये असून त्याचा त्यावेळेसचा नंबर १५३ असा होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या इमल्यामध्ये वादी क्र. १ व २ हे कायम स्वरूपी रहाण्यास आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, रामचंद्र व सिताबाई हे कायम स्वरूपी दावा मिळकतीत रहात होते.

१६. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वडीलांनी दावा मिळकत क्र. १ मध्ये स्वत: घर क्र. १५३ बांधले होते व ते आजही त्याठिकाणी आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, दावा मिळकत अ.क्र.१ मधून १५ ते २० वर्षापूर्वी काढलेला कसाल ते आंब्रड रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत क्र. १ मध्ये वादीने १० चौ. फुट X १५ चौ. फुट चा मांगर बांधलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की,

ग्रामपंचायत इमला क्र. १५३ चे समोर अंगण आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे अंगण वादीच्या मालकीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच जमीनीमध्ये वादीची विहिर, पंप व पाईप लाईन आहे.

१७. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये वादी क्र. १ ते ४ व त्यांच्या आई वडीलांनी स्वतः लावलेली आणि वाढवलेली १५ आंब्याची झाडे, २० ते २२ काजू कलमे, १२ ते १५ नारळाची झाडे, ८ साग, ४ ते ५ बांबु बेटी आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, दावा मिळकतीत आंबे, रतांबे, आईन, किंजळ इत्यादी बारीक सारीक उत्पन्न देणारी व लहान मोठी बरीच इमारती झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, या झाडांची देखभाल वादी करतात. हे म्हणणे खरे नाही की, झाडातून येणारे उत्पन्न वादी घेतात. हे म्हणणे खरे नाही की, दावा जमीनी व त्यामधील घर हे वादींच्या मालकीचे आहे त्यात आमचा कुठलाही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये वादींची कब्जेभोग्य वहिवाट आहे.

१८. फेरफार क्र. १९८, १९९ व २०० पाहिले किंवा कसे हे मला आठवत नाही. फेरफार क्र. १३४८ पाहिला किंवा कसे हे मला आठवत नाही. फेरफार क्र. १०४० आमच्या फॅमेलिने दाखल केला. फॅमेली म्हणजे एकत्र कुटूंबाने. फेरफार क्र. १०४० लक्ष्मण आप्पाजी बागवे, बाळकृष्ण रामचंद्र बागवे आणि सिताबाई रामचंद्र बागवे यांनी दाखल केला होता. फेरफार क्र. १०४० मध्ये काय लिहिले आहे हे मला आठवत नाही. सदरचा फेरफार दाखल करतेवेळी मी त्याठिकाणी हजर होतो. नोंद घालतेवेळी तेथे कोण कोण हजर होते हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. १०४० हा मी स्वतः दाखल केला आहे. फेरफार क्र. १३४८, १३४६, १९८, १९९ व २०० यापैकी कुठल्या फेरफारावर मी अपील दाखल केले होते हे मला आठवत नाही.

प्रश्न—फेरफार क्र. १०४० तुम्ही स्वतः, बाबाजी, लवू व लक्ष्मण यांनी दाखल केलेला नाहि का ?

उत्तर— नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदरील फेरफार दाखल केला नसल्याने मला त्याबाबत काही माहिती नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सदर फेरफारामध्ये कोणाला नोटीसा काढल्या, कोणाचे जबाब नोंदविले, विवादग्रस्त नोंद ठेवली गेली किंवा कसे हे मला माहिती नाही. फेरफार क्र. १०४० झाल्याचे मला प्रथम वकील संग्राम देसाई यांच्याकडून नोटीस आल्यानंतर समजले. हे म्हणणे बरोबर आहे की, फेरफार क्र. १०४० बाबत मला वकीलांची नोटीस आल्यानंतर समजले होते त्यापूर्वी मला त्याबद्दल काही माहिती नव्हते. हे म्हणणे बरोबर आहे की, हा फेरफार करतेवेळी बाळकृष्ण बागवे किंवा वादीला मी नोटीस पाठविली नव्हती. फेरफार क्र. १०४० चे विरूद वादी क्र. १ व २ यांनी प्रांत ऑफिस कुडाळ येथे अपील दाखल केले आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. त्या अपीलाचा नंबर आर.टी.एस्. अपील नं. ९५/२०१४ आहे किंवा कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर. टी.एस्. अपील ९५/२०१४ मध्ये मी वकीलांमार्फत हजर झालो आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपील अंतिम टप्प्यात प्रलंबित आहे.

१९. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०२/२०१४ रोजी मी पाच ते सहा अनोळखी व्यक्तींसोबत दावा मिळकतीत जावून वादी क्र. २ यांना धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीत पाच ते सहा अनोळखी व्यक्तीसमवेत गेलो, त्यावेळी वादी क्र. २ यांनी मला 'तु या जमीनीची व झाडांची पहाणी कशासाठी करीत आहेस, हे अनोळखी माणसे कोण आहेत असे विचारले असता मी त्यांना सांगितले की ही सर्व जमीन म्हणजे या तिनही मिळकती माझ्या आहेत व यात मी घर बांधणार आहे, माझ्याबरोबर आलेली माणसे हे बांधकाम करणारे ठेकेदार आहेत त्याकरीता मी जमीनीची पहाणी करीत आहे, ही सर्वजमीन व त्यातील झाडे आमची आहेत, त्यात सफाई करून मी घर बांधणार आहे, तुझा येथे काहीही संबंध नाही, तुला माझ्याविरूध्द काही करायचे असेल ते कोर्टात जा आणि करून घे, मला अडवलेस तर तुला कुटुंबासहित व या मिळकती सहित तुला नामशेष करीन असे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी वरीलप्रमाणे वादींना धमकावल्यामुळे त्यांना हा दावा दाखल करावा लागला.

२०. मी नि. ५२ कडे दाखल केलेल्या माझ्या कैफियतीत परि. क्र. ८ मध्ये दर्शविलेल्या वंशावळीचे रजिस्ट्रेशन केलेले नाही. मी दिलेली वंशावळ सत्य आहे हे दाखवण्यासाठी मी अन्य कोणता पुरावा दिलेला नाहि. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेली वंशावळ खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा माझ्याशी कोणताही संबंध नाही. माझे वडील मुंबई येथे शिवडीमध्ये नोकरीस होते. ते मिलमध्ये नोकरी करायचे. मिळकत हस्तांतरणाचे मार्ग मला माहिती नाहित. हे म्हणणे बरोबर आहे की, एखादी मिळकत आपल्या मालकीची होण्याकरीता खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र अशी तत्सम कागदपत्रे असणे आवश्यक असतात. दावा मिळकती माझ्या मालकीच्या आहेत हे दाखवण्यासाठी मी घरपट्टी हजर केलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, वर नमुद केलेल्या दस्तऐवजापैकी कुठलाही कागद माझ्याकडे नाहि. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी आमचा काहीही संबंध नाही.

२१. सन १९९७ मध्ये मी गांवी होतो. ॲड. संग्राम देसाई यांची सही पहाण्याचा मला वैयक्तिक काही योग आलेला नाही. साक्षीदारास नि. ११९ दाखवून प्रश्न विचारण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, नोटीसीवरील सहिच्या खाली संग्राम देसाई असा शिक्का नाही. माझ्या सख्ख्या मोठया भावाचे नांव बाबाजी लक्ष्मण बागवे असे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, बाबाजी राणे असे माझे कोणी सख्खे भाउ नाहित. हे म्हणणे खरे नाही की, नि. ११९ कडील नोटीस ॲड. संग्राम देसाई यांनी दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांचे लेटर हेड वापरून बनावट नोटीस तयार करून सादर केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या नोटीसीचा नि. १२० कडील लखोटा बनावट तयार करून सादर केला आहे. सन १९९० मध्ये मी खारदांडा येथे रहाण्यास होतो. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९० मध्ये मी कळवा, ठाणे येथे रहाण्यास होतो. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२१ कडील मनिऑर्डरच्या पावतीवरील सही वादी क्र. २ यांची नाही. सोनू जगन्नाथ घाडीगांवकर हे आमच्या गांवातील आहेत. त्यांचे घर व आमच्या घरामध्ये १०० फुट अंतर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, नि. १२१ कडील पावतीवर हाताने तारीख नमुद केलेली नाही. नि. १२२ च्या पावतीवर एकूण तीघांच्या सहया दिसतात. बाळकृष्ण बागवे, लक्ष्मण परब व

उज्वला लक्ष्मण परब यांच्या सहया दिसून येतात. हे म्हणणे बरोबर आहे की, पावतीवर वादीच्या वडीलांची म्हणजे बाळकृष्ण यांची सही नाही. लक्ष्मण परब व उज्वला परब आमच्या वाडीमध्ये रहातात. आमचे व त्यांचे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना बोलावून मी खोटी पावती तयार केली.

२२. हे म्हणणे बरोबर आहे की, नि. १२३ कडील पावतीवर रामचंद्र महादेव परब असे छापील पावतीवरील तारीख शिक्का, तारीख मोहोर असे नमुद केलेल्या मजकुरासमोर लिहिलेले आहे व त्याखाली पैसे घेणा—याची सही/प्राप्त कर्ता के हस्ताक्षर असे छापलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२३ कडील पावतीवरून मी रामचंद्र महादेव परब यांना मनिऑर्डर केल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२३ कडील पावतीवर बाळकृष्ण बागवे यांची सही असल्याचे मी खोटे सांगत आहे.

२३. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२४ कडील पावतीशी राधाबाई बाळकृष्ण बागवे यांचा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणा त्रयस्त इसमाचा अंगठा उमटवून मी बनावट पावती बनवलेली आहे.

२४. हे म्हणणे बरोबर आहे की, नि. १२५ कडील पावतीवर साल किंवा तारीख नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, या पावतीवरील अंगठा राधाबाई यांचा नाही. हे म्हणणे खरे नाही की, ती पावती बनावट आहे.

२५. हे म्हणणे खरे नाही की, नि.१२७ कडील पावतीवरील अंगठा राधाबाई यांचा नाहि. हे म्हणणे खरे नाही की, मी हजर केलेल्या पावत्यांशी वादींचा किंवा वादी कुटुंबाचा संबंध नाही.

२६. साक्षीदारास नि. १२६ कडील खातेपुस्तिका वाचण्यास सांगून पुढील प्रश्न विचारण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, खातेपुस्तिकेमधील माझ्या नांवाची नोंद

फेरफार क्र. १०४० अन्वये आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर खातेपुस्तिकेमध्ये केवळ फेरफार क्र. १०४० चे वर्णन नमुद आहे, त्यापूर्वीचे किंवा त्यानंतरचे वर्णन नमुद नाहि. साक्षीदारास नि. १२८ कडील कागद दाखवून प्रश्न विचारण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, नि.१२८ कडील पावतीमध्ये माझी सही नाही. नि. १२८ कडील कागदावरील हस्ताक्षर माझे आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, नि. १२८ कडील कागदामध्ये दावा इमला क्र. १५३ चा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२८ कडील दस्तावरील सहया केल्या गेल्या त्यावेळी मी त्याठिकाणी हजर होतो हे दाखवण्यासाठी कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२८ कडील कागद बनावट असून त्याच्याशी वादीच्या घराचा संबंध नाहि.

२७. बांधकाम करतेवेळी आधी पाया घालतात. त्यावर भिंती चढवतात, त्यावर छप्पर घालतात व छप्पर घातल्यावर त्यावर पत्रे किंवा कौले घालतात. हे म्हणणे बरोबर आहे की, नि. १२९ कडील कागदावर बाळकृष्ण फॅब्रिकेटर्सचा शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२९ कडील कागदावरून त्यातील नमुद सामान मी दावा मिळकतीतील घर क्र. १५३ साठी खरेदी केल्याचे दिसून येत नाही. साधारण ३५० दगड तासण्यासाठी व बसवण्यासाठी सन २००५ मध्ये अंदाजे एक लाख रूपये खर्च येत असे. हे म्हणणे बरोबर आहे की, बांधकाम पूर्ण झाल्याशिवाय त्याच्यावर छप्पर घालता येत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, दोन वेगळे ठेकेदार एकाच वेळी एकच भिंत बांधू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. १२९ व १३० कडील कागद बनावट व चुकीचे आहेत. साक्षीदारास नि. १३० कडील पावती दाखवून प्रश्न विचारण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, नि. १३० कडील पावतीमध्ये बाळकृष्ण रामचंद्र बागवे यांच्यासाठी मी घर नं. २३५ साठी पैसे भरले असे नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. १३० कडील बनावट व खोटी पावती तयार केलेली आहे. दावा जमीनीचे दस्त भरल्याबाबतची पावती मी हजर केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही दस्त भरला नाही म्हणून पावती हजर केली नाही.

२८. माझी जन्मतारीख दिनांक १६/०७/१९६२ अशी आहे. नि. १३१ कडील दाखला माझ्या भावाचा आहे.

प्रश्न— नि. १११ कडील तुमच्या सरतपासाच्या शपथपत्रामध्ये नि. १३१ कडील दाखला (नि.१०९/१०) माझा आहे असे नमुद केलेले आहे याबद्दल तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर— हा माझ्या भावाचा दाखला आहे. तो मयत झाल्यानंतर त्याचेच नांव मला ठेवलेले आहे.

हे म्हणणे खरे नाही की, त्या दाखल्याचा गैरवापर करून मी या दाव्यात तो दाखल केलेला आहे. माझ्या सरतपासामध्ये दाखल्या संदर्भात लिहिलेला मजकूर बरोबर आहे.

२९. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. १०४० दाखल करतेवेळी बाळकृष्ण बागवे व सिताबाई बागवे हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे. नि. १३१ कडील शाळा सोडल्याचा दाखला मी शाळेतून दोन वर्षापूर्वी घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. १३१ कडील दाखला बोगस व बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की, फोटो बघून हक्कसंबंध व नातेसंबंध समजून येत नाहित. हे म्हणणे बरोबर आहे की, नि. ९३ कडील अल्बममधील फोटो कोणी काढले त्याचे शपथपत्र मी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फोटोमध्ये वादी रामचंद्र व त्याच्या बहिणी प्रियांका व वैशाली दिसून येत नाहित. हे म्हणणे बरोबर आहे की, दाखल केलेल्या फोटोमध्ये घराचा घर क्र. १५३ असल्याचे दिसून येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाखल केलेल्या फोटोमध्ये मी माझ्या सरतपासात नमुद केलेल्या व्यक्तीच असल्याबाबतचा माझ्या तोंडी शब्दांशिवाय इतर कुठलाही पुरावा मी सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. ९३ कडील अल्बममधील फोटो सामाईक घराच्या गृहप्रवेशाच्यावेळचे असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरील फोटोचा वादीच्या घर नंबर १५३ शी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या कैफियतीमध्ये दिलेली वंशावळ खोटी आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत अ.क्र. २ व ३ या जमीनी वादी व प्रतिवादींच्या वडिलोपार्जित जमीनी असून अ.क्र. १ ची जमीन वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातून खरेदी घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाच्या एकत्रातील मोठा भाउ व त्यावेळचा कुटुंब प्रमुख म्हणून दावा जमीनीस रामचंद्र याचे नांव लागल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व आमची देवकार्ये

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ४३/२०१४
नि. १११ लगत

ही एकत्रात असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वेळोवेळी मुंबईवरून कुटुंबाच्या गरजेसाठी मनिऑर्डरने रक्कमा पाठविल्याचे, सदरच्या रक्कमा वादीची आई कै. राधाबाई, वडील कै. बाळकृष्ण यांनी त्या रक्कमा स्विकारल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, काही प्रतिवादींचा जन्म गांव मौजे कुंदे येथे झाल्याचे तसेच नोकरी व्यवसायानिमित्त मुंबई येथे रहात असल्याचे, शेतीच्या मोसमात, देवकार्यासाठी व कुटुंबाच्या गरजेच्यावेळी गांवी येवून जावून असतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, महात्मा गांधी तंटामुक्ती गांव समिती कुंदे यांचेकडे वादी व आमचेमध्ये तडजोड करण्यात आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तडजोडीमध्ये आम्ही मुंबईहून आल्यानंतर आम्हाला इमला नंबर १५३ मधील एक खोली रिकामी करून देण्याचे ठरल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, यापुढील जमीनीविषयी व घराविषयी कोणतेही प्रश्न असतील तर ते एकत्र बसून निर्णय घ्यायचे असे ठरल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती व त्यातील इमला क्र. १५३ वादीच्या मालकीची व स्वतंत्र कब्जावहिवाटीची आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीकडे किंवा त्यातील इमल्याकडे माझा हक्क पोहोचत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीला त्रास देवून घर व दावा जमीन बळकावण्यासाठी मी खोटी कैफियत दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—

(एस्. ए. कानशिडे)

दिनांक :—११/१०/२०१९.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.